## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य



तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

www.prabhutarun.com

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया



## प्रभु तरुण आश्रयदाते

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



वर्ष ८६ वे) प्रभुतरुण मुंबई, सोमवार, ता. १६ माहे मे, सन २०११ (अंक ९८२


*संपादकीय*

## ‘पुन्हा पडण्या.....’!

-सुहासिनी कीर्तिकर

पिकली पाने गळून पडतातच..झाडातळी साचलेला पिवळा पाचोळा रानभर होण्यासाठी वाऱ्याने सैरावैरा भरकटतो. ‘पुन्हा पडण्या वरतून पर्णराशी’ ही जागा त्यांना मोकळी करून द्यावीच लागते. हा निसर्गनियमच आहे. झाडापानांना, फुलाफळांना जसा हा नियम लागू आहे तसा पशुपक्षी, मनुष्यमात्र या जीवंत निसर्गघटकांनाही लागू आहेच. मात्र गळून पडल्यावर अनंतात सैरावैरा भरकटल्यानंतरही ‘तरुतळी’ आठवणी रूजतात. आठवणींचा कधी पाचोळा होत नाही! आठवणी अशा अमर असतात. म्हणूनच थोरामोठ्यांच्या पिकलेपणाने गळून पडण्यात हे वेगळेपण असतं की ते आठवणींच्या रूपाने, त्यांच्या मोठेपणाच्या कार्याने पुन्हापुन्हा रूखातळी रूजतात, फुलतात, फळतात.

परवा परवा साहित्यिक वि. आ. बुवा गेले. पुस्तकांचे शतक ठोकणारे लेखक, हमखास खसखस पिकवणारे उत्तम वक्ते, मानपानाचा खोटा फुलोरा न मिरवणारे साधे शिस्तशीर सज्जन गृहस्थ, इमानेइतबारे लेखनसाधना करणारे व्रतस्थ असे बुवा मराठी मनाची सावली होऊन सतत त्या मनाबरोबर वावरले. अमूक संमेलनाचे अध्यक्षपद मिरवावे, तमूक पुरस्कारासाठी मोर्चेबांधणी करावी, अमक्या साहित्यिकाशी/मंत्र्याशी संधान बांधांवे, तमक्या संस्थेच्या पदावर असावे- असा कुठलाही अट्टाहास त्यांनी कधी केला नाही. वक्ता म्हणून दिले ते मानधन त्यांनी घेतले, लेखक म्हणून मुंबई मराठी साहित्य संघ, महाराष्ट्र साहित्य परिषद अशा मुंबई-पुण्याच्या संस्थांनी दिलेले पुरस्कार स्वीकारले. महाराष्ट्र शासनाने दिलेल्या अनेक पुरस्कारांना त्यानी निर्मम वृत्तीने घरात घेतले. कल्याणला राहणाऱ्या या माणसाने सर्वच वेळी ‘कल्याणमस्तु!’ असेच म्हटले. कारण तो त्यांच्या जगण्याचा सहजधर्म होता. या धर्माला त्यांनी साधक बनून एका शिस्तीत वाढवले होते. ही शिस्त अनुकरणीय अशीच अन् अवघडही.त्यांच्याकडे स्वत:चे असे समृद्ध ग्रंथभांडार होते. त्याची स्वतंत्र अकारविल्हे सूची होती. पुस्तक दुसऱ्याला उधार देणे या शिस्तीत बसत नव्हते. लिहिण्याच्या खास टेबलाला वरून उघडणारे चार मोठमोठे कप्पे (खण) होते. एकात प्रसिद्ध झालेल्या लेखांची तारीखवार कात्रणं. एकात लिहीलेल्या लेखांची चळत. दुसऱ्यात या लेखांच्या दोन, दोन कार्बन प्रती. लिहितांनाच दोन कार्बन एकाखाली एक घालून काढलेल्या; अन् चवथ्या कप्प्यात पुस्तकांच्या, मुखपृष्ठाच्या छायाप्रती, कालानुक्रमे त्यांची सूची अन् शेवटी त्यावर आलेले इतरांचे अभिप्राय. रोज पहाटे पाच ते नऊ आणि दुपारी तीन ते पाच असे लेखनाची बैठक मारून बसायचेच. (‘प्रभुतरुणा’चे संपादकीय लिहायचे तरी माझे मन आज लिहू; उद्या लिहू करत राहते. अगदीच वेळेचा दट्ट्या बसला की लेखणी शाई झरू लागते. कुठे हे माझे अनुभवचित्र; आणि कुठे बुवांची अशी लेखनसाधना! मानलं बुव्वा!) बरं ही लेखनसाधनाच

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## ‘घरचा ओसामा.....?’

-संजना कोठारे

`US KILLS OSAMA, BLOWS PAK COVER', Justice done say kin of 9/11 victims' जिथं पाहावं तिथं ओसामा बिन लादेनच्या मृत्यूची चर्चा. जगभर ओसामाच्या मृत्यूचा जल्लोष. सर्वसामान्य घरातसुद्धा हीच चर्चा. दोन दिवसांपूर्वीच, ‘अगं, तू ऐकलंस का? ओसामा गेला.’ टी.व्ही.वर ताजी बातमी ऐकून सासूबाई सांगायला आल्या. इंटरनेट आणि हल्ली ‘फेसबुक’मुळे बातम्या प्रचंड वेगाने पसरतात. त्यामुळे ओसामाच्या मृत्यूची बातमी टी.व्ही. न पाहता माझ्या कानापर्यंत आधीच पोहोचली होती. एका ओसामाचा मृत्यू. अमेरिकेपासून भारतापर्यंत साजरा होतो आहे खरा, परंतु त्या एका ओसामाचा वध करून आपण आतंकवादाचा अंत करू शकतो का? एका ओसामाच्या जागी आतापर्यंत दहा ओसामा तयार झाले असतील. ह्या दहशतवादाला अंत नाही. पैसा, सत्ता आणि प्रसिद्धी, हे कोणाला नको??? जो तो ह्या त्रिकुटाच्या मागे झगडताना आढळतो.

जिथे पाहावे तिथे सत्तेसाठी भुकी माणसं आपलं वर्चस्व दाखवण्याचा प्रयत्न करत असतात. वर्चस्व दाखवायला ‘ओसामाच’ बनायची गरज नाही. आपल्याला बऱ्याच घरांमध्येसुद्धा ओसामा आढळून येतील. अर्थात ते आतंकवादी नाहीत, परंतु सत्ताधारक तरी नक्कीच आहेत. घरोघरी असलेल्या ह्या ‘ओसामा’ची विविध रूपं ‘एकता कपूर’ आपल्या ‘क.....’च्या धारावाहिकांच्या माध्यमातून आपल्याला इतकी वर्षे दाखवत आली आहे आणि एकता कपूरकडून प्रेरणा घेऊन हल्ली मराठी धारावाहिकसुद्धा त्याच आदिशक्तीच्या जोरावर आपले टीआरपी वाढवत आहेत. कोणत्याही प्रकारचा कलह घडण्यामागे त्या एका कारस्थानी व्यक्तीचा हात असतो आणि तो म्हणजे ‘स्त्री’!!!

जर ओसामा एक स्त्री असता तर आतापर्यंत नक्कीच जगाला आपल्या ताब्यात घेतलं असतं. सगळ्या वाहिनीवर स्त्रीची प्रतिमा आणि भूमिका एकसारखीच दर्शवतात हे माझ्या ऐकिवात आले आहे. पण त्यामागे काहीतरी तथ्य असल्याशिवाय असे होणार नाही. त्या ‘इडियट बॉक्स’पासून मी दहा हात लांब असते खरी, परंतु त्यात चाललेल्या घडामोडी कोणत्या न कोणत्या मार्गाने ऐकण्यात येतात. एका ‘स्त्री’कडे जेवढी शस्त्रे आहेत तेवढी कदाचितओसामाकडेसुद्धा नसतील. सर्वात मोठे शस्त्र आहे तिची कारस्थानी बुद्धी आणि दुसरे म्हणजे अश्रू. .. ज्याच्या जोरावर ती आपली सत्ता स्थापित करीत असते. एखाद्या कमकुवत नवऱ्यावर ह्या दोन शस्त्रांचा वापर ती अतिशय सहजरीत्या करते. मी कुठेतरी एक सुंदर वाक्य ऐकले होते जे अशा नवऱ्यांची वस्तुस्थिती दर्शवते.. ते म्हणजे, `I AM THE MASTER OF MY HOUSE. I HAVE MY WIFE'S PERMISSION TO SAY SO.' परंतु नवरा तिच्यापेक्षा प्रभावी असला तर ती तिचे सामर्थ्य व्यर्थ घालवत नाही, परंतु तेच उपयोगात आणायला ती इतर माध्यम स्वीकारते. तिचे इतर

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

असल्याने बुवांचं लिहिणं एकटाकी. एकही शब्द न खोडता. मजकुरात कधीही, कुठेही फेरफार न करता. ना त्यांनी हा फेरफार केला, ना प्रकाशकांनी. इतका विलक्षण अचूकपणा, इतका विलक्षण प्रवाही ओघ. पहिल्यावहिल्या लेखापासून एकही लेख कधी म्हणून 'साभार परत' आला नाही; हा विक्रमच. संस्कृत शब्द-म्हणी-वाक्प्रचारांवर प्रभुत्व, शब्दाच्या अर्थविक्षेपाची अचूक जाण आणि प्रगल्भ-सुसंस्कृत विनोदाचे अंगभूत देणं लाभलेल्या बुवांचे लेखन सुसंस्कृतपणा सोडून कधीही चळले-ढळले नाही. विनोदाने आपली कुटुंबवत्सलता कधी सोडली नाही.

जे लिखाणाच्या बाबतीत तेच वक्तृत्वाच्या बाबतीत. आपल्या भाषणाचे मोजून शंभर विषय त्यांनी तयार ठेवले होते, वर्गीकरणासह! कुठे बोलायचे आहे, समोरचा श्रोता कोणत्या प्रकारचा आहे, प्रसंगाचे औचित्य काय आहे हे पाहून पंधरावीस विषय त्या वर्गीकरणानुसार ते पाठवीत. त्यातील एकावर मग निमंत्रकाच्या निवडीप्रमाणे ते सलग दीड तास बोलत. 'भाषण' हा त्यातला एक विषय होता. त्यावर श्रोत्यांना हसते ठेवतांना स्वत: मात्र ते गंभीर चेहरा करून बोलत. 'एक भाषण इथे दिले, झटकले; दुसरीकडे वाळत घातले, तिसरीकडे झटकले-वाळत घातले' असे तेच ते बोलणाऱ्यांबद्दल ते म्हणत. ते स्वत: मात्र त्यातले एक कधीच नव्हते. म्हणूनच त्यांनी आपल्या भाषणाची कधी तीच ती धुणी धुतली नाहीत. वाळत घातली नाहीत. त्यातल्या विनोदाने श्रोत्यांची हसूनहसून मुरकुंडी वळली हे निश्चित. काळेले, बुटकेसे असे वि. आ. बुवा अशावेळी कायमचे लक्षात राहत.

आता तर त्यांच्याविषयीच्या आठवणीतून ते आपल्या कायम लक्षात राहतील.वि. आ. बुवांच्या पाठोपाठ साहित्यिक, पत्रकार असलेले श्री. नारायण आठवले आठवणींचे धनी झाले. अनुराधा आठवले या आपल्या ज्ञातीच्या. म्हणून ते आपले जावईदेखील. मला आठवते, ते खासदार झाले तेव्हा सुरेश विठ्ठल सभागृहात त्यांचा भव्य सत्कार सोहळा ते 'ज्ञातीचे जावई' म्हणूनच झाला होता. नलिनी तळपदेंचे शब्द आता आठवत नाहीत. पण 'परभांचा जावई खासदार झाला' असा व्यापक आनंद त्यातून भरून राहिला होता. 'अनिरुद्ध पुनर्वसु' सारख्या सतराशे साठ टोपणनावांनी त्यांनी आपली लेखणी चालवली. जागरूक पत्रकारिता केली. 'गोमांतक'चे संपादक असताना गोवामुक्तीलढा जोसात होता. 'मराठी भाषा ही गोव्याचीच भाषा आहे' हा मुद्दा लावून धरत त्यांनी गोव्यातील अनेक ठिकाणी जाऊन तेथे आवाज उठवला होता. गोवा आकाशवाणी-वरून 'भुरग्याल्या अंगणात' बरोबरीने मराठी कार्यक्रम घडवून आणण्यात त्यांचा मोठा पुढाकार होता. त्यांच्या राजकारणी व्यक्तिम-त्वापेक्षाही हे 'अक्षराचे धन' आणि जागरूक पत्रकारितेचे संचित खरोखरच मोलाचे होते. त्यांच्या जाण्याने या सगळ्यालाच आता वेगळ्या संदर्भाचे मोल आलेले आहे. अनुराधाबाई आणि त्यांची मुक्त पत्रकारिता करणारी कन्या यांच्या दु:खात आम्ही सर्व सहभागी आहोत.

वि. आ. बुवा लेखक, नारायण आठवले पत्रकार-लेखक, तर ३ मे रोजी आपल्यातून गेलेले जगदीश खेबुडकर गीतकार-कवी. इजा-बिजा-तिजा झाले. फारच वाईट. जगदीश खेबुडकरांची सुंदर मुलाखत रवींद्र आवटी यांनी त्यांच्या पंच्याहत्तरीनिमित्त घेतली होती दादरला. चैतन्याने सळसळते झाड ७५ वर्षांचे वाटत नव्हते. यावर्षी म्हणजे डिसेंबर १०ला ठाण्यात अ. भा. मराठी साहित्य संमेलनात विश्वास पाटील यांनी घेतलेली त्यांची मुलाखत पुन्हा ऐकली. चार वर्षात चैतन्याच्या सळसळीत अजिबात कसूर नाही. मुलाखतीत पुनरावृत्ती नाही. दोन्ही वेळा वेगवेगळे खेबुडकर दिसले. भाग्ययोग असा की ज्या हॉटेलमध्ये माझी वक्ता म्हणून उतरण्याची सोय केली होती तेथेच तेही उतरलेले. त्यामुळे संमेलनस्थळी विश्वास पाटलांच्या गाडीतून नानासाहेब (खेबुडकर), विश्वास पाटील, बडोद्याच्या डॉ. अरुणा जोशी अन् मी असे एकत्रच गप्पा मारत गेलो. 'मी मुळात खरा शिक्षक हो. त्यामुळे तुम्हा प्राध्यापकांना भेटलो की मला कवितेतील शब्दब्रह्मच भेटीला आल्यासारखे वाटते.'- म्हणाले, 'विश्वास पाटील माझा विद्यार्थी. आजचा संमेलनाध्यक्ष उत्तम कांबळेही माझा विद्यार्थी. माझी मुलाखत घेऊन बघा कसे गुरुऋण फेडताहेत.' असे बोलत आम्ही संमेलनस्थळी आलो. मुलाखत उत्तरोत्तर रंगतच गेली. दीड तासानंतर संयोजकांनी पाटलांना आवरते घेण्यास सांगितले. लोकांनी निषेध नोंदवला. मग आणखी अर्धा तास , आणखी अर्धा तास अशी मुलाखत रंगत गेली. स्वत:च्या गायकीत आपल्या कविता म्हणत, आठवणीतले प्रसंग नाट्यपूर्ण करत जगदीश खेबुडकरांनी ती चिरस्मरणीय केली. आता त्यांची अमर गीते, कविता यांचीच सोबत उरली! 'पापण्यांची तोरणं' डोळ्यावर बांधून ती नित्य जपायची एवढंच!

'वरतून पडणाऱ्या पर्णराशी'कडे पाहताना या तिघांनाही भावमय आदरांजली!

(पान १ कॉलम ४ वरून)

लक्ष्य म्हणजे घरातील इतर व्यक्ती. किंवा कुणीच जर साफडले नाही तर आजुबाजूच्या घरात डोकावून त्यांच्या घरात आपली कारस्थाने अमलात आणते. परंतु ती आपली शक्ती कुठेही कमी होऊ देत नाही.

'ओसामा बिन लादेन' असो किंवा हा 'घरचा ओसामा'... शेवटी एका बाबतीत अगदी सारखे...कारस्थानी! हल्लीची लग्न मोडण्यामागे स्त्रीचा वाटा कदाचित पुरुषापेक्षा अधिक आहे असं म्हणणं चुकीचं ठरणार नाही. कारण बायको म्हणून जरी तिनं आपलं वर्चस्व दाखवण्याचा प्रयत्न केला नाही तरी आजच्या युगातसुद्धा 'सासू'चे वर्चस्व आहे ही वस्तुस्थिती आहे. अशा गोष्टी कानी पडल्यावर आश्चर्य वाटतं. कारण आपल्या आजुबाजूला आपल्याला असे काही आढळताना दिसत नाही. परंतु आपल्याला घरातली 'अंदर की खबर' माहिती असते? ती उधळली जाते आपल्या 'फॅमिली कोर्टा'च्या गाभाऱ्यात. तेव्हा 'स्त्री'ची दुसरी बाजू पाहायला मिळते. जे एकता कपूर दाखवते त्यात काहीतरी तथ्य आहे यावर विश्वास बसायला लागतो. कैकेयी, मंथरामुळे रामाला वनवास गाठावा लागला. सीतेमुळे रामायण घडलं. द्रौपदीमुळे महाभारताचे महायुद्ध घडले. 'ध' चा 'मा' करणाऱ्या आनंदीबाईच होत्या नाही का? अर्जुनालासुद्धा शिखंडीच्या मदतीमुळे भीष्माचा वध करता आला. राक्षसांचा सर्वनाश करायलासुद्धा त्या परमेश्वराला स्त्रीरुपी महादेवीचा अवतार घेऊन यावं लागलं. शेवटी तात्पर्य काय??? प्रत्येक घडामोडी मागे स्त्रीचा हात असतो.

असो! परंतु अशी व्यक्ती आपल्या आयुष्यात येण्यामागे एकच कारण आहे आणि ते म्हणजे आपले 'भोग' जे आपल्याला भोगावेच लागणार. सगळा हिशोब त्या परमात्म्याकडे आहे जो आपल्याला आपल्या प्रत्येक अनुभवातून काहीतरी शिकवतो. आपल्या आयुष्यात येणारी प्रत्येक व्यक्ती आपल्याला काहीतरी धडा शिकवून जाते आणि त्याच कारणासाठी आपला जन्म होतो. कारण हे आपले पूर्वजन्माचे भोग आहेत जे आपण निरनिराळ्या तऱ्हेने भोगत असतो.

प्रत्येक नाण्याला जशा दोन बाजू असतात तसेच ह्या 'घरच्या ओसामा'लासुद्धा दुसरी बाजू आहेच. तिच्याशिवाय घरचं एक पानसुद्धा हलत नाही. नवऱ्याची, मुलांची, घराची आणि एका कुटुंबाला लागणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळायला ती समर्थ आहे. आज स्त्री एका पुरुषाच्या बरोबरीने चालत आहे आणि असं कोणतंही माध्यम नाही जिथं ती आपलं कौशल्य दाखवू शकत नाही. जशी पंतप्रधानाची महत्त्वपूर्ण जबाबदारी श्रीमती इंदिरा गांधी यांनी बखुबी निभावली तशी दुसऱ्या बाजूस फ्लॉरेंस नायटिंगल आणि मदर तेरेसा यांनी आपल्या प्रेमळ, निस्वार्थी स्वभाव आणि बलिदानाने आपला ठसा या पृथ्वीतलावर उमटवला. आजच्या आपल्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील असो किंवा नासाच्या स्पेस शटलमधून जाणारी कल्पना चावला असो, आजची स्त्री पुरुषाच्या बरोबरीने चालत आहे आणि प्रत्येक जबाबदारी यशस्वीरीत्या सांभाळायला पूर्णत: समर्थ आहे. अशी ही 'स्त्री' जसं घडवू शकते ,तसंच बिघडवूही शकते. म्हणून प्रत्येक स्त्रीने जर आपल्यातला अहंकार, आपल्यातला 'ओसामा' बाहेर काढून टाकला तर प्रत्येक 'घरच्या ओसामा'चा वध व्हायला वेळ लागणार नाही.

### नोंद

श्री. सिद्धकुमार धराधर ह्यांनी पा. प्र. चॅरिटीझला लिहिलेल्या पत्राचा संक्षिप्त भाग 'प्रभुतरुणा'त छापला होता. त्या पत्राला चॅरिटीझने सविस्तर, तर्कशुद्ध, मुद्देसूद उत्तर दिले आहे. त्याची एक प्रत 'प्रभुतरुणा'कडे आली आहे. जागेअभावी त्या पत्रातील भाग या अंकात देता येत नाही. दिलगीर आहोत.

नेहमीप्रमाणे अत्यंत चोख असा असणारा चॅरिटीझचा वार्षिक अहवाल मिळाला. अभिनंदन

**-संपादक**

## प्रभुप्रभात वर्धापनदिन

१ मे २०११ रोजी साहित्य संघात प्रभाताचा वर्धापनदिन श्री. मधुकर यशवंत तळपदे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. या दिनी 'यु टर्न' या नाटकाचा बहारदार प्रयोग झाला. वर्धापन दिनाचे औचित्य साधून दरवर्षी 'प्रभात'तर्फे पुरस्कार व पदके सन्मानपूर्वक देण्यात येतात. या वर्षीचे मानकरी होते- श्री. शीतल नागेंद्र तळपदे (शरद दळवी स्मरणार्थ कला पुरस्कार), श्री. शिवनंदन रामराव राव (मनोहर धराधर स्मरणार्थ विज्ञान पुरस्कार), सौ. ज्योती मिलिंद कोठारे (शलाका दळवी स्मरणार्थ शिक्षण पुरस्कार), डॉ. अजित केशवराव देसाई (यशवंत कीर्तिकर स्मरणार्थ धन्वंतरी सुवर्णपदक), सौ. अक्षदा अजित तळपदे (चित्रसेन तळपदे स्मरणार्थ कलोपासक सुवर्णपदक), श्री. मुकुंद खंडेराव कोठारे (मोतीराम नायक स्मरणार्थ बहुजन सेवा सुवर्ण पदक), डॉ. पवन प्रदीप कीर्तिकर (पी. के. राव स्मरणार्थ क्रीडा सेवा सुवर्ण पदक), माधुरी विहंग नायक (चंपूबाई कोठारे स्मरणार्थ कृतज्ञता सुवर्ण पदक), आदिनाथ महेश कोठारे (डॉ. अरविंद तुळशीदास राणे स्मरणार्थ प्रोत्साहन पुरस्कार), कु. टीना दिलीप अजिंक्य (शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरीकरिता निहारीका पदक) आणि श्री. निलेश विठोबा नायक (सुगंधा चित्रसेन तळपदे स्मरणार्थ प्रशंसा पुरस्कार). सर्वांचे हार्दिक अभिनंदन.




# 'हस दे तू!'

## हाफ टिकट

किशोरकुमारसारखा चतुरस्त्र नट आजपर्यंत पाहाण्यात आला नाही. उत्तम गायक, अभिनेता, विनोदाची उत्तम जाण. एक 'कंप्लीट पॅकेज' असं ज्याला म्हणतो तसं हे परिपूर्ण व्यक्तिमत्व होतं. आजच्या गाण्याकडे वळण्याआधी या गाण्याची पार्श्वभूमी पाहू या. विजय (किशोरकुमार ) कॉलेजात जाणारा एक खट्याळ तरुण. त्याच्या उनाडकीला कंटाळून वडील त्याला घराबाहेर काढतात. विजय जबलपूरहून मुंबईला यायला निघतो. स्टेशनवर येतो; पण खिशात पैसे नसतात. त्याला एक भन्नाट कल्पना सुचते. एका १०/१२ वर्षाच्या मुलाला चॉकलेटच्या मिषाने फसवून त्याचे कपडे चोरतो. किशोरकुमार मुन्नाच्या वेषात येतो. हाफ पँट, हाफ शर्ट, गळ्याभोवती स्काऊटचा रुमाल, गळ्यात शिट्टी अडकवलेली, डोक्यावर कॅप, डोळ्यावर फ्रेमचा चष्मा. गंमतीची गोष्ट म्हणजे पँट सरकू नये म्हणून खांद्यावरून बांधलेले दोन पट्टे. किशोरकुमार पाय गुडघ्यात वाकवून, बोबडं बोलून १०/१२ वर्षाच्या मुलाचं सोंग आणतो. गाडीत चढतो. दरम्यान राजाबाबू (प्राण ) एका जवाहिऱ्याचे हिरे चोरून पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी ते हिरे मुन्नाच्या बॅक पॉकेटमध्ये ठेवतो. मुन्नाला त्याची कल्पना नसते. राजाबाबू आपण मुन्नाचे अंकल आहोत अशी बतावणी करतो.

गाडीचा डबा, इतर सहप्रवाशी, पाचसहा लहान मुलं. मुन्ना गाणं म्हणतो. सुरवातीच्या दोन ओळी संथ लयीत.

आ रहे थे इस्कूलसे
रस्तेमे हमने देखा एक खेल सस्तेमे
राजाबाबू-क्या बेटा क्या?(मुन्नाला जवळ ओढून हिरे चाचपतो.)
मुन्ना- आँ माँ (लांब पळतो)
चिल चिल चिल्लाके कजरी सुनाये
झूम झूम कौआभी ढोलक बजाये
अरे वा वा वा वा अरे वा वा वा वा

सगळे सहप्रवासी कोरसमध्ये 'अरे वा वा वा वा'

ढोलक वाजवणारं पात्र थोडंसं विचित्र विनोदी दिसते. काटकुळा, ऊंच आणि ३६० अंशामध्ये फिरणारी त्याची लांबलचक मान. डब्यात एक तरुण व तरुणी एकमेकाकडे चोरटे प्रेमकटाक्ष टाकत असतात. मुन्ना त्यांच्याजवळ जातो.

छुक-छुक-छुक चली जाती है रेल
छुक-छुक-छुक-छुक-छुक-छुक चली जाती है रेल
चुप चुप चुप तोता मैना का खेल
प्यार की पकोडी मिठी बातोंका मेल

जवळच बसलेल्या भेळवाल्या-कडून एक एक वस्तू चिमूटभर उचलून तोंडात टाकतो.

थोडा नून, थोडी मिरच, थोडा सौंठ, थोडा तेल
अरे वा वा वा.

राजाबाबू सारखा हिरे काढण्याचा प्रयत्न करतो. पण मुन्ना त्याला ढकलून लांब पळत असतो. शेवटी राजाबाबू कंटाळून एका कोपऱ्यात बसतो. एका बाकावर दोन पोलीस एका चोराला जेरबंद करून बसलेले असतात.

कोई मुझे चोर कहे कोई कोतवाल
किससे यकीन करू मुश्किल सवाल
दुनियामे यारो है बडा गोलमाल
कही ढोल कही पोल, सिधी बात टेढी चाल
अरे वा वा वा

डोळे मिटून बसलेल्या राजाबाबू-समोर हातवारे करून नाचतो. त्याच्या डोळ्यासमोर हात फिरवतो.- कही ढोल कही पोल, सिधी बात टेढी चाल अरे वा वा वा . शेवटी गाण्याची लय वाढते. ठेका जलद होतो. मुन्ना नाचता नाचता एका पाठमोऱ्या व्यक्तीच्या पाठीवर थाप मारतो. तो तिकीटचेकर असतो. इतका वेळ धागडधिंगा करणारा मुन्ना भानावर येतो. दचकतो कारण त्याच्याकडे तिकीट नसतं.

चित्रपटः- हाफ टिकट १९६२
संगीतः- सलील चौधरी
गायकः- किशोरकुमार
गीतः- शैलेंद्र
कलाकारः-किशोरकुमार, मधुबाला, प्राण, हेलन,

## अश्विनी ये ना

गीतः- शांताराम नांदगावकर
स्वरः- अनुराधा पौडवाल, किशोरकुमार
चित्रपटः- गंमत जंमत १९८७
पात्रयोजनाः- सचिन-गौतम, अशोक सराफ–फाल्गुन वडके, वर्षा उसगांवकर-कल्पना (गौतमी), चारुशीला साबळे- अश्विनी वडके

गौतमला पैशाची जरुरी असते. त्याला त्याच्या भावाचं ऑपरेशन करायचं असतं. गौतमचा मित्र फाल्गुन त्यालाही त्याचं कर्ज फेडण्यासाठी पैशाची गरज असते. नोकरीचे सर्व प्रयत्न फोल गेल्यावर ते एका श्रीमंत बापाची पोरगी पळवून खंडणी मागण्याचा बेत आखतात. पण त्यामुळे त्यांच्या डोक्याचा ताप आणखीनच वाढतो. ही मुलगी (वर्षा उसगांवकर) अत्यंत नाठाळ आणि बेमुर्वतखोर असते. तिच्या हट्टीपणामुळे फाल्गुन खूप वैतागलेला असतो. आपली बायको, अश्विनी हिला सोडून गौतमबरोबर राहात असतो. तिकडे अश्विनी फाल्गुनच्या आठवणीत झुरत असते. तिच्या मनात अनेक शंका कुशंका असतात. फाल्गून उद्विग्न होऊन अश्विनीला साद घालतो.

फाल्गुन- अश्विनी ये ना.....ये ना....
प्रिये जगू कसा तुझ्याविना मी राणी ग
कशी ही जिंदगीत आणिबाणी ग
ये ना प्रिये
मी तर प्रेमदिवाणा रसिला
दे प्यार जरासा नशिला
अश्विनी- प्रिया उगाच संशयात मी बुडले रे
तुला छळून मी जळून गेले रे
ये साजणा
विसर झाले गेले सख्या रे
शरण आले राया तुला रे

असं म्हटल्यावर पुढे अनुराधा म्हणते 'ना-ना-ना!' हे अगदी लाजवाब.

-नंदकुमार विजयकर
nandusuhas03@gmail.com

## सोशल समाजाचा वर्धापनदिन

पाठारे प्रभू सोशल समाजाचा १२३वा वर्धापनदिन गुढीपाडव्याला सोमवार दिनांक ४ एप्रिल २०११ रोजी खारच्या पाठारे प्रभु को-ऑप. हाऊसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात प्रेक्षकांच्या तुडुंब गर्दीत उत्साहाने संपन्न झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्री. बन्सीधर सदाशिव धुरंधर होते. कार्यक्रमाचा शुभारंभ श्रीमती क्षमा कोठारे, सौ. रजनी कोठारे व योगिता नवलकर यांच्या सुरेल सरस्वतीवंदनाने झाला. श्रीमती नलिनी तळपदे रचित समाजगीत सादर झाल्यावर समाजाच्या विश्वस्त श्रीमती वंदना नवलकर यांनी आपल्या मनोगतात समाजाचा आजवरचा प्रवास कालखंड-निहाय अतिशय मुद्देसूद विशद केला आणि सोशल समाजाने आजवर कै. बाबासाहेब जयकर, कै. प्रमोद नवलकर यांच्यासारखे खंदे वक्ते नार्माण केले याचे स्मरण करून आताही समाजाने ज्ञातीतील युवापिढीला वक्तृत्वाचे धडे देऊन नवीन वक्ते निर्माण करावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. नवनवीन क्षेत्रात आपले युवक आज शैक्षणिक यश संपादन करीत आहेत, त्यासाठी समाजाकडे नवीन पुरस्कार देण्याकरिता ज्ञातीबांधवानी सढळ हस्ते सहाय्य करावे असेही त्यांनी आवाहन केले.

सोशल समाजाच्या अध्यक्षा सौ. प्रमिला तळपदे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून देताना बन्सीधरांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवले. समाजाच्या उपाध्यक्षा श्रीमती स्वाती प्र. राणे रचित अध्यक्षाभिनंदन-गीत श्रीमती क्षमा कोठारे यांनी श्री. राजन चितळे यांच्या संगीत दिग्दर्शनात सुरेल सादर केले. पुष्पगुच्छ, भेटवस्तू व मिष्ठान्न देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सुवर्ण पदके प्रदान करण्यात आली. पुरस्कारप्राप्त व्यक्तींचा परिचय समाजाचे सं. चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर आणि समाज कार्यकारिणी-च्या सदस्या सौ. स्वाती जयकर यांनी नेमक्या शब्दात करून दिला. सर्व पुरस्कारप्राप्त व्यक्तींनी आपले मनोगत दिलखुलास शब्दात व्यक्त केले.

शैक्षणिक पुरस्कार डॉ. सुरेखा बन्सीधर धुरंधर यांच्या शुभहस्ते वितरीत करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. बन्सीधर धुरंधरांनी आपल्या सोप्या, सहज, ओघवत्या वक्तृत्वशैलीने श्रोत्यांची मने जिंकली. आयुष्यातील अनेक कळीच्या मुद्यांना त्यांनी स्पर्श केला. या समारंभात त्यांच्या ज्येष्ठ भगिनी सौ.

(पान ६ कॉलम ३वर)

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



## UVA ANCH

Together Towards Tomorrow

**Prabhu Tarun Website :**

A request to all members who have registered for the Prabhu Tarun website to kindly provide their email IDs once again to us.

Due to some technical reasons, the website has not been functional, but we will soon get it up and running. We apologize for the inconvenience caused. We will provide you with new user name and password. Please get in touch soon.




# 'प्रत्युष ११' रंगारंग कार्यक्रम

दिनांक ११ जून, सायंकाळी ७ वाजता,

रंगशारदा, वांद्रे (प.)

येथे होत आहे.

## आवाहन

**तरुणाईचा सोहळा**
**प्रत्युष ११ - आगळावेगळा**
**कलाकारांना हवे प्रोत्साहन**
**मदतीचे आश्वासन**
**कलावंतांना देण्या दाद**
**प्रायोजकांना घालतो साद**
**प्रतिसाद द्या. प्रतिसाद द्या.**
**प्रायोजक म्हणून पुढे या.**
**लवकरात लवकर संपर्क साधा.**

*संपर्कासाठी :-*

**मयुरा नायक - ९८१९९३२७४०**
**डॉ. सुरेखा धुरंधर - ९८२१०३२२७२**

### कार्यक्रमाची तिकीटे पुढील ठिकाणी उपलब्ध

| | |
|---|---|
| संजना कोठारे | - ९८३३११०९९३ |
| मयुरा नायक | - ९८१९९३२७४० |
| डॉ. सुरेखा धुरंधर | - ९८२१०३२२७२ |
| सुहासिनी कीर्तिकर | - ९८२०२५६९७६ |
| रोनिका विजयकर | - ९३२३२२३८७९ |
| डॉ. पवन कीर्तिकर | - ९८२११६३६८१ |
| भक्ती प्रधान-शेटत्ये | - ९८३३७९२७५९ |
| शिल्पा जयकर | - ९८६९३४५२९८ |
| सुश्मिता कोठारे | - ९७६९८६०९०९ |
| निषाद धुरंधर | - ९९६७७००५५७ |
| दीपक धैर्यवान | - ९८२०९८८८०८ |
| प्रमिला तळपदे | - ९८२१४४७६७५ |
| जान्हवी कीर्तिकर | - ९८२०६९१५१९ |
| प्रतिमा प्रधान | - २८६३२५१३ |

**त्वरा करा, त्वरा करा.**
**दरवर्षीप्रमाणे झुंडीने या. या रे या सुजन**
**आपण सारेजण. . .**
**'प्रत्युष'चे होऊ साक्षीदार**
**भाग घेणारा आहे आपलाच कलाकार**

(पान ३ कॉलम ५ वरून)



# अनोळखी ओळख की ओळखीचा अनोळखी

-उज्ज्वला ब्रह्मांडकर

परवा सकाळी ऑफिसला जाण्याच्या वेळेला बाहेर पडले... फूटपाथवरून खाली उतरून रस्ता ओलांडल्यानंतर लगेचच ती समोरून आली. तश्शाच नेहमीच्या लगबगीने. मी तिचे आज नीट निरीक्षण केले. पंजाबी ड्रेस, कानात मोठ्या रिंग्ज, खांद्यावर चॉकलेटी रंगाची पर्स, कुरळे केस मागे पिननं बांधलेले, केसात टपोरं लाल गुलाबाचं फूल, तिच्या गोऱ्यापान रंगाला तो लाल ड्रेस नी त्यावरचं ते मॅचिंग फूल खूप शोभून दिसत होते. आमची दोघांची नजरानजर झाली. दोघींच्याही चेहऱ्यावर मंद स्मित तरळलं. ती भराभर चालत होती. मी मात्र व्हीआरएस घेतल्यानं आरामात चालत होते. तिच्या नजरेत माझ्या हळू चालण्याबद्दल आश्चर्य डोकावलं. रोज ती दिसल्यावर मला हायसं वाटायचं. ती दिसली म्हणजे अजून साडेआठ वाजलेले नाहीत हे समजून यायचं. कदाचित तीसुद्धा माझ्या दिसण्यावर घड्याळाचा अंदाज बांधत असेल. काय असेल तिचं नाव? कुठे राहात असेल? घरी कोण कोण असेल? काहीही माहीत नाही. तिची ओळख गोरी, कुरळे केसवाली एवढीच. थोडं पुढे गेल्यावर एक मध्यमवयीन बाई दिसायची. तिची रोज एकच साडी बघून सुरुवातीला आश्चर्य वाटलं. नंतर कळलं की इंडियन ऑईलमध्ये काम करते ती. तो तिचा युनिफॉर्म आहे. तेव्हापासून इंडियन ऑईलवाली ही तिची ओळख झाली.

असे कितीतरी अनोळखी पण ओळखीचे चेहरे खूपदा दिसतात. संध्याकाळी गॅलरीत उभे राहिले की एक काठी घेतलेले सडपातळ वृद्ध काका जातात. कधी मुलीला शाळेतून घरी नेणारी एका गुबगुबीत गालाच्या गोंडस मुलाची आई नी तो मुलगा रस्त्यातून रमत गमत जाताना दिसतात. तरी कधी रोज केसात गजरा माळून जाणारी तिशीतली तरुणी दिसते. कधी भगिनी समाजातल्या कार्यकर्त्यांचा ग्रुप किंवा तिकडचा कार्यक्रम संपल्यावर सभासद भगिनींचा ग्रुप थबकत थबकत गप्पा मारत जाताना आढळतो. बसमध्ये तर असे कितीतरी.. शाळा, कॉलेजात जाणारी ठराविक मुले, अधल्यामधल्या स्टॉपवर उतरणारे वेगवेगळ्या ऑफीसमधले लोक, बायका इ. एवढंच नव्हे तर कोपऱ्यावरची गजरेवाली, म्हातारा पेरु, चिकू, केळी विकणारा...ह्या सगळ्यांची नावं माहीत नाहीत, कुठे राहतात ते माहीत नाही. कुठं जातात ते ठाऊक नाही..नी तरीही हे सगळे ओळखीचे वाटतात. रोज हे लोक दिसले नाहीत तर चुकल्याचुकल्यासारखं वाटतं. परवा दिसलेली कुरळे केसवाली कधी दिसली नाही तर आपल्याला उशीर झालाय की काय ह्या शंकेने जीव वरखाली व्हायचा. पुन्हा पुन्हा घड्याळ बघत, घड्याळ मागे तर नाही ह्या शंकेवर हेलकावे खात स्टॉपवरची मध्यमवयीन जरा स्थूल बाई दिसेपर्यंत मला कासावीस वाटायचं. जणु हे सगळे रस्त्यावरचे मैलांचे ओळखीचे टप्पे. पूर्ण अनोळखी तरीही मनाचा कोपरा ठामपणे व्यापणारे. मग वाटते नावात काय आहे? ज्यांची नावं गावं घरं पत्ते माहीत आहेत, त्यांच्याविषयी अशी काय विशेष माहिती असते आपल्याला? ह्या अनोळखी माणसांएवढेच ओळखीच्यांचे स्वभावही खऱ्या अर्थानं माहीतच नसतात. तरीही आपण नाव ऐकलं की म्हणतो-'हो हो! आमची चांगली ओळख आहे त्यांच्याशी!' किंवा 'त्यांना चांगले ओळखतो आम्ही.'

तर मग ओळख म्हणजे नेमकं काय? फक्त नाव, पत्ता, थोडंसं संभाषण, काही घडलेल्या घटना, त्यांच्याबरोबर घालवलेले काही क्षण एवढंच?

हे अशा ओळखीचे लोक अनोळखी व्हायलाही वेळ लागत नाही. एखादा उगीचच आपल्याशी वाईट वागतो. तेव्हा तो समोरून आला तरीही आपण त्याला ओळख दाखवत नाही. कुणी स्वत:च्या स्वार्थासाठी आपल्याला त्रास दिला तर पुन्हा तो भेटेल तेव्हा त्याच्याशी बोलणंही नको वाटतं. त्याचं नाव, गाव, पत्ता सर्व विसरावंसं वाटतं. आणि बघता बघता असे ओळखीचे चेहरे अनोळखी होऊन जातात आणि त्यांच्यापेक्षा रोज भेटणारी अनोळखी पण ओळखीच्या चेहऱ्याची माणसं उगीचच आपली वाटतात. कधीतरी ती कुरळे केसवाली थांबेल, बोलेल. ते बोलणं जुजबीच असेल.

पण ते बोलणंच खूपदा चांगलं वाटतं. थोडावेळ टाईमपास. ओळखीच्या माणसांबरोबर बोलणं म्हणजे उगीचच समोरच्याच्या मनाचा बहुधा नेहमीच चुकणारा अंदाज बांधणं, कधी त्यांच्या स्तुतीनं खूष होणं नी कधी त्यांच्या बोलण्यानं नाराज होणं. काय तो मान अपमान त्यांच्या मर्जीनुसार किंवा आपल्या व्यक्तिमत्त्वानुसार. तसंही बोलणं जुजबीच. 'काय? कसं काय? तुमच्याकडे सगळे ठीक आहेत ना? आमच्याकडेसुद्धा ठीक आहे.' किंवा बदलतं हवामान, कुठच्या तरी ओळखीच्या निंदा...नकोच वाटतं हे सगळं...नी मग ते ओळखीचे चेहरे पूर्ण अनोळखी वाटायला लागतात. कधीतरी अशा माणसांकडून आपल्याला धोका दिला जातो नी वाटतं, अरे! असं कसं आपण ह्या माणसाला ओळखलंच नाही.

●

## पाठारेप्रभु महिला समाज

गुरुवार दिनांक १४ एप्रिल २०११ रोजी सायंकाळी ४ वाजता पाठारे प्रभु को-ऑप. हाऊसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राचे सभागृह, १२वा रस्ता, खार(प.) येथे पाठारे प्रभु महिला समाजाने चैत्रातील वासंतिक हळदीकुंकू समारंभ आयोजित केला होता. त्याच दिवशी पाककलातज्ज्ञ (ईटीव्ही वाहिनीवरील 'मेजवानी' फेम) श्री. विष्णु मनोहर यांच्या पाककृतीवरील तीन पुस्तकांचे प्रकाशन अभिनेत्री व गायिका सौ. मधुराणी गोखले-प्रभुलकर यांच्या हस्ते राजा प्रकाशनचे श्री मुळे ह्यांच्या सहकार्याने झाले. विष्णुजींचे स्वागत करून त्यांना केळ्याच्या पोळ्या व पाठारे प्रभुंचे कै. लक्ष्माबाई धुरंधर लिखित हजार पाकक्रियांचे पुस्तक समाजातर्फे देण्यात आले.

विष्णु मनोहर आपल्या मनोगतात म्हणाले की, लक्ष्मीबाई धुरंधरांचे 'गृहिणीमित्र' मी लॅमिनेट करून संग्रही ठेवले आहे. त्यातल्या अनेक पाककृती मला उपयोगी ठरतात. समोरील सर्व महिला श्रोत्यांनाही त्यांनी सुगरण ठरवितांना 'तुम्ही सर्व धुरंधर आहात' असे म्हटले.

श्री. विष्णु मनोहर ह्यांनी बटर पनीर, राईस रोनी, पनीर माखनवाला आणि ॲपल नेस्ट अशा खुमासदार पाककृती करून दाखविल्या. त्यांना सौ. बिबा नायक व श्री. हिरेन नायक ह्यांनी मदत केली. सौ. बिबा ह्यांनी पाककृतीला लागणारी सामग्री व सॉस बनवून आणले होते.सर्व भगिनींना पदार्थांची चव चाखायला मिळाली.

उपस्थित भगिनींना हळदीकुंकू, चणे, बत्तासे, गजरे, आंबाडाळ व पन्हे देण्यात आले. देवीची आरास करण्यासाठी सौ. प्रतिभा विजयकरांतर्फे फुले आणली होती. विश्वस्त सौ. उषा जयकर ह्यांच्यातर्फे गजरे व सौ. प्रमिला तळपदे ह्यांच्यातर्फे पन्हे देण्यात आले. सौ. पवित्रा प्रदीप कीर्तिकर ह्यांनी देवीसाठी मंगळसूत्र व फेरवे भेट दिले. आंबाडाळ व पन्हे ह्यांची कुटुंबसखीने व्यवस्था केली होती.

भगिनींनी बहुसंख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची मजा घेतली. त्याचप्रमाणे सवलतीच्या दरात भगिनींनी पाच पुस्तकांची खरेदी केली. असा आगळावेगळा कार्यक्रम आभार प्रदर्शनानंतर संपन्न झाला.

शनिवार दि. ३० एप्रिल २०११ रोजी सुरेश विठ्ठल हॉल, ठाकुरद्वार येथे फॅन्सीड्रेस स्पर्धा, फॅन्सी वर्क स्पर्धा, कलात्मक पाककृती स्पर्धा, फॅब्रिक पेंटिंग स्पर्धा, वकृत्व स्पर्धा व सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आल्या.उपाध्यक्षा सौ. स्वाती जयकर यांनी परीक्षकांचे व उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. वंदना कानिटकर (फॅन्सीड्रेस व वकृत्व स्पर्धे), सौ. वीणा सुरेश नवलकर (फॅब्रिक पेंटिंग), श्रीमती विजया गायकवाड (फॅन्सी वर्क), सौ. प्रमिला तळपदे (कलात्मक पाककृती), सौ. स्वाती जयकर (सामान्य ज्ञान) ह्यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. निकाल पुढीलप्रमाणे-

*१) फॅन्सीड्रेस स्पर्धा (महिलांसाठी):*
प्रथम क्रमांक- श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर (म्हातारी),
द्वितीय क्रमांक- सौ. पल्लवी परेश कोठारे (कोळीण)

*२) फॅन्सीवर्क स्पर्धा:*
प्रथम क्रमांक- सौ. शेफाली पुष्पल विजयकर,
द्वितीय क्रमांक- श्रीमती शिल्पा प्रकाश धुरंधर

*३) कलात्मक पाककृती स्पर्धा:*
प्रथम क्रमांक- सौ. विद्या विजय त्रिलोकेकर,
द्वितीय क्रमांक- सौ. शेफाली पुष्पल विजयकर,
तृतीय क्रमांक- सौ. पल्लवी परेश कोठारे

*४) फॅब्रिक पेंटिंग स्पर्धा:*
प्रथम क्रमांक- सौ. पल्लवी परेश कोठारे
द्वितीय क्रमांक- सौ. श्रेया शैलेंद्र तळपदे
तृतीय क्रमांक- सौ. शेफाली पुष्पल विजयकर

*५) वक्तृत्व स्पर्धा- (मराठी) महिलांसाठी:*
प्रथम क्रमांक- सौ. उर्वशी आनंद धराधर
द्वितीय क्रमांक- श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर

*६) वक्तृत्व स्पर्धा- (हिंदी) महिलांसाठी*
प्रथम क्रमांक- सौ. स्वप्ना विनित जयकर
द्वितीय क्रमांक- विभागून-
१) श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर
२) कु. पूजा उदय तळपदे

*७) सामान्य ज्ञान स्पर्धा-वयोगट १० ते १५*
एकच स्पर्धक असल्यामुळे समाजातर्फे बक्षीस कु. आशिका पुष्पल विजयकर हिला देण्यात आले. कॉफीपानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

●

## रामवाडी राममंदीर

विठोबा कान्होजी कोठारे राममंदीर, रामवाडी येथे सालाबादप्रमाणे १६ मार्च २०११ रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळात अबीरोत्सव साजरा झाला. हरीभक्त परायण श्री.सिद्धेश मणेरीकरबुवा यांचे याप्रसंगी हरिकीर्तन झाले. या मंदिरात २० मार्च रोजी क्रांतीवीर चाफेकरांच्या स्मारकाचा विस्तार केला गेला. ऑल इंडिया हिस्टरी कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. जगन्नाथ व्ही. नाईक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या दिवशी गीतकार निनाद आजगांवकर यांचे गीतरामायणही मंदिरात सूर भरून गेले.

## प्रभुतरुणास देणगी

❖ स्नेहल मिलिंद कोठारे यांजकडून रु. ५०१/-

❖ सौ. प्रतिभा रमेश महादेव कोठारे यांजकडून रु. ५००/-

❖ कै. साधना आणि कै. चंद्रकांत लक्ष्मण गोरक्षकर यांचे सुपुत्र डॉ. श्री. अजित यांची राष्ट्रीय प्रतिरक्षा रूधीर विज्ञान संस्थेत उपसंचालकपदी नेमणूक झाल्याबद्दल डॉ. अजित यांजकडून रु. २५०/-

❖ श्री. उल्हास वामनराव कोठारे (नालासोपारा) यांजकडून कै. श्री. वि. वि. कोठारे आणि श्रीम. सीना वामनराव कोठारे या मात्यापित्यांच्या स्मरणार्थ रु. १०१/-

## परीक्षेतील सुयश

**सीपीए(युएसए)**

श्री. अंकुर अरविंद राव, ८५%

**बीएसस्सी (टेक्सास)**
**बायोकेमिस्ट्री आणि जेनेटिक्स**

नीती अंजन कोठारे

## CONGRATULATIONS

Miss Natasha Nileem Trilokekar, the granddaughter of Mr. Saroj Trilokekar and Mr. Ravindra Mankar, has been awarded the `Mercy Ascot Surgical Nursing Scholarship 2011'. She is currently in her final year of study, working towards a conjoint (double) degree of Bachelor of Nursing and Bachelor of Health Science at the University of Auckland, New Zealand. This prestigious University places among the top 1% of universities in the world. The scholorship has been awarded on the basis of her high academic grades, performance at previous clinical placements and a panel interview. She will receive a grant of $5000 and an internship in operating theatres during her final semister of study (July-December 2011). The scholarship also offers her the opportunity to join the surgical team after graduation. Mercy Ascot is the leading and largest private hospital group in New Zealand with state of the art hospitals, facilities and world renowned surgeons.

## अभिनंदन



डॉ. श्री. अजित चंद्रभान गोरक्षकर यांची नुकतीच राष्ट्रीय प्रतिरक्षा रुधीर विज्ञान संस्थेमध्ये (National Institute of Immuno-hematology) उपसंचालकपदी नेमणूक झाली आहे.

ही संस्था भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद (ICMR-Indian Council of Medical Research), आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीतील असून, डॉ. अजित गोरक्षकर या संस्थेत गेली ३४ वर्षे रक्ताशी संबंधीत अनेक अनुवांशिक रोगांवर (Thalassemia & sickle cell anemia) संशोधन करीत आहेत. त्यांचे सुमारे १२५ शोधनिबंध, लेख अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोध निबंध पत्रिकेमध्ये प्रकाशित झाले आहेत.

कै. चंद्रभान आणि साधना गोरक्षकर यांचे सुपुत्र डॉ. अजित चं. गोरक्षकर सध्या मुंबई विद्यापीठामध्ये `Applied Biology' या विषयात एमएस्सी व पीएचडी करिता , तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान (MUHS) विद्यापीठामध्ये `Translasion Medicine Hematoogy' या विषयात पीएचडी करिता संशोधन मार्गदर्शक आहेत.

-प्रेषक:
**सौ. स्मिता चंद्रशेखर धैर्यवान**

## अभिनंदन

❖ डॉ. सुमन नवलकर यांना 'अजबुली घंटुली'या पुस्तकाबद्दल वंदना प्रकाशनाचा 'आशीर्वाद पुरस्कार' प्राप्त झाला. अभिनंदन.

❖ श्री. राजेंद्र शरद तळपदे यांनी वानखेडे स्टेडियमची व्यवस्था राखणारे 'व्हेन्यु मॅनेजर' म्हणून क्रिकेट सामन्यादरम्यान कामगिरी पार पाडली. अभिनंदन.

❖ श्री. प्रताप मोतीराम वेलकर यांना स्वातंत्र्यवीर सावरकर हा पुरस्कार त्यांच्या लेखनाबद्दल बहाल करण्यात आला. पाच हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अभिनंदन.

❖ श्री. सुभाष बाळाराम त्रिलोकेकर हे महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशनतर्फे झालेल्या ६५वर्षांवरील डबल टेनिस टुर्नामेंटमध्ये प्रथम क्रमांकाने विजयी ठरले आहेत. गेल्या वर्षी ते 'रनर अप' होते. यावर्षीच्या विजयाबद्दल त्यांचे अभिनंदन. (यावर्षी खार जिमखान्यात आमिर खान यांच्याबरोबरही ते टेबल टेनिस खेळले आहेत.)

❖ श्री. महेश कोठारे यांना 'मी मराठी' वरील 'मन उधाण वाऱ्याचे' या मालिकेच्या निर्मितीबद्दल पुरस्कार लाभला. अभिनंदन.

// श्री इंद्रायणीप्रसन्न // // श्री गुरुदेव दत्त //

**प्रकाश कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा! विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबार इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :
**प्रवीण धुरंधर**
डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### आत्याबाई नाव बोला

१९-११-१० इवा निमिष धैर्यवान

### नारळ साखर दिला

४-४-११ श्री. अक्षय राजेंद्र तळपदे कु. श्रद्धा प्रभू (आंतरज्ञातीय)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ८-०४-११ | श्री. विनोद शामराव कोठारे | वय ८१, | पुणे |
| ३-०४-११ | श्रीम. प्रभा प्रभात नवलकर | वय ७९, | अंधेरी |

***चुकीची दुरुस्ती:***
गेल्या अंकात 'मरण'मध्ये श्री. जयपाल रामराव कोठारे असे वाचावे

## धन्यवाद

'प्रभुतरुण'च्या संपादिका प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांच्या वाढदिवसानिमित्त 'प्रभुप्रभात'चे अध्यक्ष आणि संपादिका यांनी पत्र पाठवून शुभेच्छा दिल्या. मन:पूर्वक धन्यवाद.

(पान ३ कॉलम ४ वरून)

बागेश्री धुरंधर-परीख यांना भावाच्या हस्ते सुवर्णपदक प्रदान करण्याचा अतिशय हृद्य असा क्षण साजरा झाला आणि आपल्या भाषणात श्री. बन्सी यांनी हा क्षण माझ्यासाठी अत्यंत भाग्याचा असल्याचे नम्रपणे नमूद केले. त्यांनी सोशल समाजाला रु. ५०००/-ची देणगी दिली.

समाजाच्या उपाध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी अध्यक्षांच्या प्रबोधनपर भाषणाबद्दल मन:पूर्वक आभार मानले. श्रीमती नलिनी तळपदे रचित विद्यार्थीगौरव गीत श्रीमती क्षमा कोठारे यांनी सादर केले. सर्व गीतांना संगीत साथ संवादिनीवर श्री. वसंत मोरे व तबल्यावर श्री. भूषण हजारे यांची होती. या वर्धापन दिनानिमित्ताने सोशल समाजाच्या गंगाजळीत रु. ३४,०००/- एवढ्या देणग्यांची मोलाची भर पडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. नीता सेंजित यांनी नीटसपणे केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कुल्फीमुळे कार्यक्रम 'गोड' झाला.

## The Pathare Prabhu Charities
### Notice Of Meeting

Notice is hereby given that the Annual General Meeting of The Pathare Prabhu Charities will be held on Sunday 5ty June 2011 at 5.00 p.m. in the Suresh Vithal Memorial Hall, Jagannath Shankarsheth Road, Thakurdwar, Mimbai 400002 to transact the following business.

### Agenda

1. To read the circular covvening the meeting.
2. To read and confirm the minutes of the Annual General Meeting held on Sunday 6th June, 2010
3. To receive and adopt the Report of the Board of Trustees and Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Pathare Prabhu Charities for the Year ended March 31, 2011.
4. To appoint M/s Contractor, Nayak & Kishnadwala, Chartered Accountant as statutory Auditors for the Year 2011-2012 to 2013-2014 and fix their Professional Fees.
5. To transact such other business as the Chairman may allow or bring forward.

FOR THE BOARD OF TRUSTEES
**THE PATHARE PRABHU CHARITIES**
**Ajit M. Vijaykar**
Chairman
P.P. Dnyati Bhuvan No. 3,
Jagannath Shankarsheth Road,
Mimbai 400002
April 17, 2011

N. B. 1. In the absence of quorum within half an hour of the scheduled time of the meeting, the meeting shall be adjourned on the same day at the same place after half sn hour from the time appointed for the meeting.
2. Members wishing to have any information relating to the business before the meeting are requested to give particulars thereof to the Chairman of the Board of Trustees atleast four days prior to the meeting, otherwise it may not be possible to furnish such information on the spot.